# देवाची क्षमा पावलेला

GOSPEL 316

***“ज्याच्या अपराधाची क्षमा झाली आहे ज्याच्या पापावर पांघरूण घातले आहे, तो धन्य!”* स्तोत्र 32:1**

ज्या चुकीच्या गोष्टी आम्ही करतो (पवित्र शास्त्रात त्यांस पाप म्हटले जाते) त्या आम्हास देवापासून वेगळया करतात. देवासोबत योग्य नाते राखण्यासाठी आम्हाला देवाकडून क्षमा प्राप्त करण्याची गरज आहे… यासाठी की आम्ही सार्वकालिकतेसाठी तयार असावे. पवित्र शास्त्रानुसार क्षमेचा अर्थ देव असे म्हणत नाही की, तो या पापांकडे कानाडोळा करेल आणि त्या पापांसाठी आपल्याला सार्वकालिक दंड देण्याचे टाळेल. नाही, तो दंड चुकविला पाहिजे. सुवार्ता (शुभवर्तमान) ही आहे की येशूने [निष्पाप देवमाणूस] वधस्तंभावर मरण पत्करून त्याच्या स्वतःच्या रक्ताने तुमच्यासाठी आधीच ती किंमत चुकविली आहे. एका अर्थाने, त्याने तुमची जागा घेतली. येशू तुमच्या बलिदानाचा ऐवजदार बनला. पण ते पुरेसे नाही. तो दंड तुमच्यावर लागू करण्याची… तुमच्या खात्यात जमा करण्याची गरज आहे. महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, हे कसे घडते? जेव्हा तुम्ही पश्चात्ताप करता (तुमच्या पापांपासून देवाकडे वळता) आणि येशूवर विश्वास ठेवता तेव्हा हे घडते. आणि मग, तेव्हाच, अगदी तेव्हाच तुम्हाला देवाची क्षमा प्राप्त होते.

### *आमची समस्या - ताटातूट*

*“कारण सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत.”* रोम 3:23

*“तर तुमचे अपराध तुम्ही व तुमचा देव ह्यांच्यामध्ये आडभिंतीप्रमाणे झाले आहेत; तुमच्या पातकांमुळे तो तुम्हांला दर्शन देत नाही, तुमचे ऐकत नाही.”* यशया 59:2

*“तेव्हा जे देवाला ओळखत नाहीत व आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताची सुवार्ता मानत नाहीत त्यांचा तो सूड उगवील. आपल्या पवित्र जनांच्या ठायी गौरव मिळावा म्हणून, आणि त्या दिवशी विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या ठायी आश्चर्यपात्र व्हावे म्हणून तो येईल, कारण आम्ही दिलेल्या साक्षीवर तुम्ही विश्वास ठेवला आहे.”* 2 थेस्सल. 1:8-9

*“कारण पापाचे वेतन मरण आहे; पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे.”* रोम 6:23

*“आपण दुर्बळ असतानाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला”* रोम 5:6

### *देवाचे समाधान - ऐवजदार देणे*

*“देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.”* योहान 3:16

*“प्रीती म्हणावी तर हीच; आपण देवावर प्रीती केली असे नाही, तर त्याने तुमच्याआमच्यावर प्रीती केली आणि तुमच्याआमच्या पापांचे प्रायश्चित्त व्हावे म्हणून स्वपुत्राला पाठवले.”* 1 योहान 4:10

*“परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला.”* रोम 5:8

*“‘त्याने स्वतः तुमची आमची पापे’ स्वदेही ‘वाहून’ खांबावर ‘नेली’, ह्यासाठी की, आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे. त्याला बसलेल्या ‘माराने तुम्ही निरोगी झाला आहात.’”* 1 पेत्र 2:24

*“परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणार्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला.”* योहान 1:12

### *क्षमा प्राप्तीचा तुमचा मार्ग… येशूवर विश्वास ठेवणे*

*“त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी* [येशू] *देतात.”* प्रेषितांची कृत्ये 10:43. *“कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे; कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही,”* इफिस 2:8-9. तुम्ही पश्चात्ताप करण्याद्वारे येशूठायी विश्वास ठेवू शकता (फक्त त्याच्याविषयी विश्वास ठेवण्याद्वारे नाही)… अर्थात, विश्वास ठेवून येशूकडे वळण्याद्वारे. तुमच्यासाठी तसे करण्याचा हा एक मार्ग आहे. ती शपथ किंवा मंत्र नाही. जर ही खरोखर तुमच्या अंतःकरणापासून इच्छा असेल तर प्रार्थना करा.

**प्रिय परमेश्वरा,**
**माझी गरज कबूल करतो… मी पातकी आहे.**
**मी पश्चात्ताप करतो… मी माझ्या पापापासून तुजकडे वळतो.**
**माझा येशूवर विश्वास आहे… की परमेश्वर असतांनाही, त्याने माझ्यासाठी वधस्तंभावर मरण पत्करले.**
**मी त्याला माझा तारणारा होण्यासाठी आमंत्रित करतो.**
**आमेन**

येशूने तुमच्या पापांचा दंड भरला. आणि येशूवर विश्वास ठेवण्याद्वारे त्याची भरपाई तुमची भरपाई बनली आहे.
तुम्हाला देवाची क्षमा प्राप्त झाली आहे. आणि येशूने म्हटले की, तुम्ही सदासर्वकाळासाठी सुरक्षित आहात, योहान 3:16.

MARATHI

***“ज्याच्या अपराधाची क्षमा झाली आहे ज्याच्या पापावर पांघरूण घातले आहे, तो धन्य!”* स्तोत्र 32:1**

एकाधिक भाषांतील *देवाची क्षमा पावलेला* च्या मोफत PDFs Gospel316.org मधून लिंक केल्या आहेत.

**जर तुम्ही मनःपूर्वक ती प्रार्थना केली असेल तर,** तुम्हाला देवाची क्षमा प्राप्त झाली आहे आणि तुम्ही त्याच्यासोबत संपूर्ण सनातनकाळासाठी सुरक्षित आहात. येशूच्या बलिदानात्मक मृत्यूने तुम्हाला क्षमा मिळवून दिली आहे. देवाने अभिवचन दिले आहे की आता तुमची सांप्रत संपत्ती म्हणून तुम्हास सार्वकालिक जीवन लाभले आहे... की तुमच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही... आणि तुम्ही मरणातून जीवनात पार गेला आहात, योहान 5:24. तुम्ही सुरक्षित आहात कारण कोणीही तुम्हाला त्याच्या सर्वसमर्थ बाहूपाशातून हिसकावून घेऊ शकत नाही. तुम्ही त्याला धरून ठेवण्यापेक्षा त्याने तुम्हाला धरून ठेवले आहे. येशूने म्हटले, *"मी त्यांना सार्वकालिक जीवन देतो; त्यांचा कधीही नाश होणार नाही आणि त्यांना माझ्या हातातून कोणी हिसकून घेणार नाही. पित्याने मला जे दिले ते सर्वांहून मोठे आहे; आणि पित्याच्या हातातून ते कोणी हिसकून घेऊ शकत नाही,"* योहान 10:28,29.

**जर तुम्ही ती प्रार्थना करावयास तयार नसाल,** तर तिला आपले सर्वोच्च प्राधान्य द्या. तुमचा निर्णय सार्वकालिक महत्वाचा आणि परिणामाचा आहे. कबरे पलीकडे दुसरी संधी नाही, *"ज्या अर्थी माणसांना एकदाच मरणे व त्यानंतर न्याय होणे नेमून ठेवले आहे"*, इब्री 9:27. जर तुमच्याजवळ अनुत्तरित प्रश्न असतील जी तुमच्या निर्णय घेण्याच्या मार्गात अडखळण असतील, तर ज्याने तुम्हाला हे दिले त्याच्याशी बोला.

## उदाहरणे आणि व्याख्या

**क्षमा.**
क्षमा. पवित्रशास्त्रावर आधारित क्षमेसाठी आपल्या पापासाठी दंड भरणे अनिवार्य आहे. पापाची शिक्षा म्हणजे देवापासून सदासर्वकाळसाठी वेगळे होणे होय. पवित्रशास्त्रावर आधारित क्षमा हे तुमचे पाप आणि त्याचा दंड तुमच्यापासून येशूकडे हस्तांतरित करणे होय. देवाने आमचे पाप आणि त्याची शिक्षा निर्दोष येशूला दिली. आणि नंतर देवाने आम्हास त्याचे नीतिमत्व दिले. हे जणूकाही स्वर्गात दोन पुस्तके होती. पहिले म्हणजे, तुमची नोंदवही, ज्यात तुम्ही केलेल्या प्रत्येक चुकीच्या गोष्टीसाठी एक गुण आहे. त्याची पाने ह्या गुणांनी भरलेली आहेत. पवित्र शास्त्र स्पष्टपणे सांगते की, काही गोष्टी ज्या आपण करतो ते पाप (कृतीद्वारे पाप) आहे आणि काही गोष्टी ज्या आपण करत नाही ते देखील पाप (कर्तव्यच्युती अथवा वगळण्याचे पाप) आहे. काही विचार देखील पातकी असू शकतात. दररोज केलेली तीन पापे प्रत्येक वर्षी 1,000 च्या बरोबर ठरतात. आयुष्यभरात, खूप पातके होतात. दुसरे पुस्तक आहे निष्पाप येशूची नोंदवही. त्याची पाने स्वच्छ आणि निष्कलंक आहेत. जेव्हा तुम्ही येशूवर विश्वास ठेवता, तेव्हा जणूकाही या दोन पुस्तकांतील नोंदणींची अदलाबदल होते. मग तुमच्या नावाचे नोंदणी पुस्तक पूर्णपणे स्वच्छ होते. तुमचे पाप आणि त्याची शिक्षा रद्द होते.

**खरे समाधान.**
येशूने म्हटले, *"मार्ग, सत्य व जीवन मीच आहे; माझ्या द्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही"* योहान 14:6. आपल्या पापामुळे देवापासून विभक्त झाल्याचे बायबलचे समाधान अनन्यसाधारण आहे. इतर धर्मांची मागणी आहे की, आम्हाला आपल्या पापांसह अनंतकाळास या आशेने तोंड द्यावे लागेल की असा कोणीतरी देव तेथे असेल जो आमच्या पापांकडे दुर्लक्ष करेल. येशूचा मार्ग अनन्यसाधारण आहे कारण तो आपल्या पापांची क्षमा करतो... आम्हास धुवून स्वच्छ करतो. मग आमची पापे मिटविली गेली असतांना आम्ही परमेश्वरास आणि अनंतकाळास सामोरे जातो कारण त्यांस येशूकडे हस्तांतरित करण्यात आले होते. प्रेषित पौलाने म्हटले: *"आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही."* प्रेषितांची कृत्ये 4:12. प्रेषित पौल लिहितो, *"कारण एकच देव आहे, आणि देव व मानव ह्यांच्यामध्ये ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे. त्याने सर्वांसाठी मुक्तीचे मोल म्हणून स्वतःला दिले ह्याची साक्ष यथाकाळी द्यायची आहे."* 1 तीमथ्य 2:5-6. येशूचा मार्ग हे खरे समाधान होय.

**येशूवर विश्वास ठेवणे.**
येशूवर विश्वास ठेवणे *येशूविषयी* विश्वास ठेवण्यापेक्षा वेगळे आहे. कल्पना करा की तुम्ही विमान प्रवासी आहात आणि तुमचे विमान पर्वतावरून उंच उडान घेत आहे जेव्हा अचानक इंजिनाचा आवाज येतो आणि त्यात बिघाड होतो. विमानाचा भीषण अपघात होऊन ते कोसळू लागले आहे. पायलट प्रत्येकाला सूचना देतो की, त्यांनी पॅराशूटचा पट्टा बांधून उघडलेल्या दारातून विमानातून बाहेर पडावे. तुम्हाला पॅराशूटबद्दल माहिती आहे. तुम्ही ते टीव्हीवर पाहिले आहे. पण आता सर्वकाही वेगळे आहे. विमानाच्या उघडलेल्या दारातून बाहेर पडण्यासाठी पॅराशूट *विषयी विश्वास करण्यापेक्षा* पॅराशूट *वर विश्वास ठेवण्याची* गरज आहे. आणि काही हायकरची बॅकपॅक काम करत नाही. तुम्हाला जिवंत राहण्यासाठी योग्य पॅराशूटची गरज आहे... त्याच्यावाचून बाहेर पाऊल टाकणे म्हणजे मृत्यू निश्चित. पॅराशूटसह बाहेर पाऊल टाकण्यासाठी 100% विश्वासाप्रत वचनबद्धता हवी. तुम्हाला काही शंका असतील... पण जिवंत राहण्यासाठी पॅराशूटवर पूर्ण विश्वास आवश्यक आहे. येशू हा एकमेव खरा सार्वकालिक पॅराशूट आहे. विश्वासाने बाहेर पाऊल टाका. त्याच्यावर विश्वास ठेवा!

**मुद्रण सूचना.** एका पानावर दुहेरी बाजूचे मुद्रण सुचवले आहे. रंगीत किंवा काळया आणि पांढऱ्या रंगात छपाई करा.

---

*देवाची क्षमा पावलेला* © 2024 हे Acts One Eight द्वारे प्रकाशित करण्यात आले आहे आणि www.Gospel316.org वरून घेतले आहे. यात कोणताही बदल न करता पूर्ण विधानासह ते तुम्ही मुक्तपणे मुद्रित करू शकता, प्रत काढू शकता, पोस्ट करू शकता किंवा इतरांना पाठवू शकता. तथापि, तुम्ही तुमच्या सेवासंस्थेचे किंवा मंडळीचे नाव अथवा लोगो त्यात जोडू शकता. Acts One Eight केवळ पवित्र शास्त्रावर आधारित आहेत. हे लोकांना येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यास आणि नंतर त्याचे शिष्य बनण्यास मदत करण्यासाठी अस्तित्वात आहे. गैर-इंग्रजी आवृत्त्यांसाठी भाषांतर सेवा www.ChristianLingua.com. द्वारे पुरविण्यात आली आहे. मूळ इंग्रजी आवृत्तीतील पवित्र शास्त्रातील अवतरणे न्यू अमेरिकन स्टँडर्ड बायबल (NASB) मधील आहेत. या आवृत्तीतील बायबलचे अवतरण "बायबल सोसायटी ऑफ इंडिया" मधील आहेत.